|| स्त्रीशक्तिरतुल्या सदा ||

महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
**Maharashtra State Commission for Women**

गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डिंग)
पोटमाळा, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
Tel. : 022-2659 0474 / 2659 2707
Website : www.mscw.org.in

Gruha Nirman Bhavan (MHADA Bldg.)
Mezzanine Floor, Kalanagar, Bandra (E.), Mumbai 400 051.
Toll Free No. 155209
E-mail : mscwmahilaayog@gmail.com

क्रमांक :-ममआ-२०२६/EVENT/का-३/267 दिनांक :- १३/२/२०२६

## नोटीस

विषय :- जागतिक महिला दिन आयोजित कार्यक्रमाचे नियोजन करण्याकरीता कार्यक्रम व्यवस्थापक (Event Managements) साठी नामांकित संस्थांकडून निविदा मागविणेबाबत.

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या वतीने दिनांक ०७/३/२०२६ रोजी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून होण-या कार्यक्रमात राजकारण, समाजकारण, क्रिडा आणि प्रशासन अशा क्षेत्रात महिलांसाठी भरीव कार्य करणा-या व्यक्तींचा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमास महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागाचे मा.मंत्री महोदय उपस्थित राहणार आहेत. तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी, वरिष्ठ अधिकारी, समाजसेवी संस्था (NGO) यांची उपस्थिती असणार आहे. तरी सदर कार्यक्रमाचे नियोजन करण्याकरीता कार्यक्रम व्यवस्थापक (Event Managements) साठी नामांकित संस्थांकडून संपूर्ण माहितीसह सीलबंद लखोट्यात निविदा मागविण्यात येत आहेत. तरी इच्छूक असणा-यांनी आपल्या लेटरहेडवर निविदा आयोग कार्यालयास सादर करावीत. तसेच दरपत्रकामध्ये रक्कम रुपये, G.S.T. नंबर लागूकर आकारणी स्वतंत्ररित्या दर्शविण्यात यावी. तसेच नोटीस संदर्भाचा उल्लेख करणे आवश्यक आहे. त्यानुसार खालील प्रमाणे कार्यक्रमाचे नियोजन करण्यात यावे.

- कार्यक्रमासाठी स्टेजवर LED आणि विषयानुसार स्टेजवरील मांडणी, सजावट, आसन व्यवस्था असावी.
- स्टेज डेकोरेशन, कॉडलेस माईक व साऊंड सिस्टिम यांची व्यवस्था करावी.
- रांगोळी, दीप प्रज्वलन साहित्य, सूत्रसंचालक, नोंदणीकरिता आवश्यक साधन सामग्री.
- संपूर्ण कार्यक्रमाचे २ कॅमेरा सेटअपने व्हिडियो शूटिंग करावी.
- संपूर्ण कार्यक्रमाचा गोषवारा दर्शविणारा एक व्हिडिओ (कालावधी किमान ३ मिनिटे) आणि मान्यवरांच्या भाषणांचे संपादित केलेले ०७ व्हिडिओ (कालावधी ४० ते ६० सेकंद) .
- कार्यक्रमाची फोटोग्राफी करावी आणि फोटो अल्बम तयार करावा. उपरोक्त फोटो व व्हिडियो पेन ड्रायव्हमध्ये देण्यात यावे.
- कार्यक्रमाचे Facebook Live करणे,
- डिजिटल बॅक ड्रॉप, कार्यक्रम पत्रिका, ४ स्टॅण्डी इत्यादीं तयार करणे.
- मान्यवर व्यक्तींकरिता आयोगाचे नाव व लोगो यांचेसह आवश्यकतेनुसार सन्मानचिन्ह, सत्कार साहित्य उपलब्ध करणे.
- प्रोजेक्ट रिपोर्ट ४ प्रतीत.
- कार्यक्रम प्रसिध्दी पत्रक तयार करणे.
- सभागृहातील Electricity Consumption charge व Generator चा खर्च करणे.
- मान्यवर आणि उपस्थितांसाठी अल्पोपहाराची ५०० नग व्यवस्था करावी.

सदर नोटीसद्वारे उपरोक्त पत्त्यावर दिनांक २५/२/२०२६ रोजीपर्यंत दुपारी ०३.०० वाजेपर्यंत सादर करावीत. सदर निविदा त्याच दिवशी सायंकाळी ०४.०० वाजता उघडण्यात येतील. संबंधितांच्या अधिकृत प्रतिनिधींनी आयोग कार्यालयात उपस्थित रहावे. तरी सदर बाबतचा अंतिम निर्णय संपूर्णत: महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयाकडे राखून ठेवण्यात येत आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

Vaidya 13/02/2026

प्रशासकीय अधिकारी

ठिकाण :- वांद्रे, मुंबई